

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ९ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०५ वा | रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

जिल्हा बँकेत शिट्टी जोरात वाजवा; 'मतदानाला घाबरू नका, सदसद्विवेकबुद्धीने मतदान करा'

विरोधकांना धैर्यशील मोहिते-पाटलांचे आव्हान!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आता राजकीय संघर्ष चांगलाच पेटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखालील स्वाभिमानी शेतकरी पॅनेलने निवडणुकीत ताकद दाखवण्याची तयारी केली असून, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी थेट पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर निशाणा साधत विरोधकांच्या राजकारणावर जोरदार हल्लाबोल केला. 'यापूर्वी कोल्हापूर आणि लातूरमध्ये शिट्टी जोरात वाजली आहे. आता सोलापुरातही शिट्टीचा आवाज घुमवा,' असे आवाहन करत त्यांनी जिल्हा बँकेची निवडणूक गांभीर्याने लढण्याचे संकेत दिले.

स्वाभिमानी शेतकरी पॅनेलच्या प्रचारसभेत बोलताना धैर्यशील मोहिते-पाटील यांनी विरोधकांकडून मतदारांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप केला. जिल्ह्यात कोणतीही निवडणूक आली की निधी आणि विकासकामांचे आमिष दाखवून मतदारांना धमकावण्याची पद्धत सुरू असल्याचा टोला त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना लगावला.

'निधी हवा असेल तर आम्हाला मतदान करा'; धमकीच्या राजकारणावर टीका

जिल्हा परिषद निवडणुकीत निधी हवा असेल तर आम्हाला मतदान करा, अशा प्रकारे धमकी दिली गेल्याचा आरोप मोहिते-पाटील यांनी केला. वसंतराव देशमुख यांच्या विधान परिषद निवडणुकीवेळीही विकासकामांचे कारण पुढे करून मतदारांवर दबाव टाकण्यात आला होता. आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीतही त्याच पद्धतीचा वापर होत असल्याचे ते म्हणाले.

यापुढे जाऊन मतदारांनी दहा-दहा जणांच्या समूहाने मतदानाला जायचे, इतरांनी जायचे नाही, अशा सूचना देऊन मतदारांवर लक्ष ठेवले



जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय इतिहासात नेतेमंडळी बूथवर उभे राहून मतदानावर लक्ष ठेवत असल्याचे यापूर्वी कधी पाहिले नव्हते. मात्र, विधान परिषद निवडणुकीत आमदारही बूथवर उभे राहून मतदान करून घेत होते, असा दावा त्यांनी केला.

११८ मतांपर्यंत मजल; विरोधकांच्या दाव्यांना प्रत्युत्तर

विधान परिषद निवडणुकीच्या वेळी आमच्याकडे सहा मते तरी आहेत का, अशी महाविकास आघाडीची खिल्ली उडवली जात होती. मात्र, वसंतराव देशमुख यांनी त्या निवडणुकीत ११८ मतांपर्यंत मजल मारली, याची आठवण धैर्यशील मोहिते-पाटील यांनी करून दिली.

मतदान तालुकानिहाय कळत नाही; अफवांना बळी पडू नका!

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मतदान कोणाला केले, हे समोरच्या पॅनेलला कळणार असून तालुकानिहाय मतदानाची माहिती मिळणार असल्याची भीती मतदारांमध्ये निर्माण केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, सहकार कायद्यानुसार कोणाचेही वैयक्तिक मतदान दुसऱ्याला कळू शकत नाही. तालुकानिहाय मतदानाची माहिती मिळण्याचीही कायद्यात तरतूद नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर आपल्या पॅनेलच्या वतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज दिला असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचे मतदान एकत्र करून त्यानंतरच मतमोजणी करावी, अशी मागणी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

'भिऊ नका, शिट्टी वाजवा'; सर्व उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन

मतदारांनी कोणत्याही दबावाला किंवा धमकीला बळी पडण्याची गरज नाही. आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जे योग्य वाटते, त्यानुसार मतदान करा. जिल्ह्यात पुरोगामी विचार टिकवायचे असतील, तर स्वाभिमानी शेतकरी पॅनेलच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्या, असे आवाहन धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केले.

या निवडणुकीत शिट्टी हे स्वाभिमानी शेतकरी पॅनेलचे चिन्ह असून, कोल्हापूर आणि लातूरप्रमाणे सोलापुरातही शिट्टीचा आवाज बुलंद करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यामुळे जिल्हा बँकेची निवडणूक केवळ सहकारापुरती मर्यादित न राहता राजकीय प्रतिष्ठेची लढाई बनण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत.

माजी संचालकांना दुहेरी दणका

सोलापूर जिल्हा बँकेपाठोपाठ केडरमधूनही बादं

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून बाद ठरलेल्या सहा माजी संचालकांना सर्वोच्च न्यायालयानेही दिलासा नाकारला असतानाच, आता सोलापूर जिल्हा देखरेख संघाच्या (केडर) निवडणूक छाननीतही त्यातील पाच जणांचे उमेदवारी अर्ज नामंजूर झाल्याने त्यांना दुहेरी दणका बसला आहे.

निवडणूक प्रक्रिया पुढे गेल्याचे कारण देत सर्वोच्च न्यायालयाने बँकेच्या निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने या सहाही माजी संचालकांचे बँकेत पुनरागमनाचे मार्ग बंद झाले आहेत.

न्यायालयातही अपयश; पाच वर्षांसाठी बँकेचे दरवाजे बंद...

सहकार कायदा कलम ८८ आणि ११० अ अन्वये झालेल्या कारवाईमुळे रणजितसिंह मोहिते-पाटील, संजयमामा शिंदे, दिलीप माने, जयवंतराव जगताप, बबनराव आवताडे आणि सुरेश हसापुरे यांचे जिल्हा बँकेचे उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी अवैध ठरवले होते. या निर्णयाविरोधात विभागीय



सहनिबंधक दिग्विजय आहेर आणि कोल्हापूर उच्च न्यायालयात दाद मागूनही त्यांच्या विरोधात निकाल गेला होता. तसेच, सहकारमंत्री व मुख्यमंत्र्यांकडे कारवाईला स्थगिती देण्याची मागणी करूनही यश आले नाही. अखेर सर्वोच्च न्यायालयात माजी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल मनिंदर सिंह, माजी ॲटर्नी जनरल मुकुल रोहतगी, ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल, अभय अंतुरकर, अभिजित कुलकर्णी व महेश शिंदे यांनी बाजू मांडूनही, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती अपरेश कुमार सिंह यांच्या खंडपीठाने हस्तक्षेपास नकार देत याचिका फेटाळून लावली. त्यामुळे पुढील पाच वर्षांसाठी या सहा माजी संचालकांसाठी जिल्हा बँकेचे दरवाजे बंद झाले आहेत.

(पान 2 वर..)

राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर होऊन बळीराजा व जनतेच्या जीवनात सुख-समृद्धी नांदू दे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पांडुरंगाला साकडे

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- राज्यातील दुष्काळी परिस्थिती दूर होऊन बळीराजा आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी व समाधान नांदू दे, असे साकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

कार्तिकी यात्रा २०२६ निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी सुधाकर दशरथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यानंतर मंदिर समितीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

यावेळी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार संजय जाधव, आमदार अभिजित पाटील, बापूसाहेब पठारे, राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, समितीचे



कार्तिकी यात्रेत सुधाकर शिंदे दाम्पत्य मानाचे वारकरी-

कार्तिकी यात्रा २०२६ निमित्त २१ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या शासकीय महापूजेसाठी दर्शन रांगेतील माळकरी भाविकांमधून मानाच्या वारकऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील उंचगाव (खुर्द) येथील शेतकरी सुधाकर दशरथ शिंदे (वय ५८) व त्यांच्या पत्नी प्रणिता सुधाकर शिंदे (वय ५१) यांची मानाचे वारकरी म्हणून निवड झाली. शिंदे दाम्पत्य गेल्या ११ वर्षांपासून नियमित वारी करत असून, त्यांना सुशील व प्रणव हे दोन मुलगे आणि गायत्री व संस्कृती या दोन मुली आहेत. श्री. सागर महाराज वाशिमकर यांच्या मार्गदर्शनाखालील वारकरी परंपरेशी जोडलेले हे दाम्पत्य गेल्या २५ वर्षांपासून माळकरी असून, शेती व्यवसाय सांभाळत भक्तिभावाने वारकरी संप्रदायाची परंपरा जपत आहेत.

कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, समिती सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पंढरपूर येथे कार्तिकी यात्रेदरम्यान लाखो भाविक श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येतात. सध्या संपूर्ण पंढरपूर भक्तिमय वातावरणाने भारावून गेले आहे. आपण सर्वजण येथे वारकरी भावनेने येतो. सर्वसामान्य वारकऱ्यांना श्री विठ्ठलाचे दर्शन सुलभतेने व कमी वेळेत मिळावे, यासाठी व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आले आहे. त्यामुळे दर्शनासाठी लागणारा वेळ कमी होऊन वारकऱ्यांना लवकर दर्शनाचा लाभ मिळत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

वारीच्या नियोजनाबाबत प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवण्यात आला असून, भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन केले आहे. कार्तिकी यात्रेदरम्यान भाविकांना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले.

राज्यातील ३१० तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. खरीप व रब्बी हंगामातील पाऊस अत्यंत कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले असून, शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. (पान 2 वर..)

सोलापूर जिल्ह्यातील ऊसदराचा तिढा कायम

सीमावर्ती भागातील ऊस कर्नाटकात रवाना

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्रातील ऊसदर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दक्षिण सोलापूर तालुक्यातील सीमावर्ती भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कर्नाटकातील साखर कारखान्यांकडे ऊस पाठवण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील साखर कारखान्यांकडून ऊसदराचा अंतिम निर्णय होत नसताना कर्नाटकातील कारखान्यांनी ३,७०० ते ३,७११ रुपये प्रतिटन दर जाहीर केल्याने सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांचा कल कर्नाटकाकडे वाढत आहे.

विजापूर जिल्ह्यातील चडचण तालुक्यातील हिनाळ येथील श्रीदत्त साखर कारखान्याने ३,७११ रुपये, तर इंडी तालुक्यातील धुळखेड येथील भीमाशंकर साखर कारखान्याने ३,७०० रुपये प्रतिटन दर जाहीर केला आहे. महाराष्ट्रातील कारखान्यांच्या तुलनेत हे दर अधिक असल्याने सीमावर्ती भागातील शेतकरी कर्नाटकातील कारखान्यांना ऊस पाठवण्यास प्राधान्य देत आहेत.

दरम्यान, भीमा आणि सीना



या दोन्ही नद्या आटल्याने तसेच विंधनविहिरींची पाणीपातळी खालावल्याने दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर पाण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. उभा ऊस जगवणेही कठीण होत असून, ऊस लवकर गाळपाला जावा आणि त्याला योग्य दर मिळावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

एकीकडे महाराष्ट्रात ऊसदरासाठी आंदोलन सुरू असताना दुसरीकडे सीमावर्ती भागातील ऊस कर्नाटकात जात असल्याने राज्यातील साखर कारखानदारांसमोरही ऊस उपलब्धतेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील ऊसदराचा तिढा लवकर सुटणार का, याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

क्रीडा भारतीचे वीर जिजामाता क्रीडा पुरस्कार; बंडगर, बागडे आणि गुंटूक मातांचा होणार गौरव

डॉ. विलास हारपाळे यांना जीवनगौरव पुरस्कार, पाच क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचाही सन्मान

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या यशामागे खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या मातांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी क्रीडा भारतीच्या सोलापूर शाखेच्या वतीने दिले जाणारे वीर जिजामाता क्रीडा पुरस्कार यंदा तीन मातांना जाहीर झाले आहेत. आंतरराष्ट्रीय लॉन टेनिसपटू संध्याराणी बंडगर, आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आश्लेषा बागडे तसेच अल्ट्रारनिंग आणि ॲथलेटिक्स क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांच्या मातांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. अशी माहिती क्रीडा भारती सोलापूरचे मंत्री राजेश कळमणकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संध्याराणी बंडगर यांच्या माता सुमन शिवाजी सुरनर, आश्लेषा बागडे यांच्या माता छाया कल्याण बागडे आणि साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांच्या माता वैशाली केशव गुंटूक यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

येत्या २४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा शिंदे चौक येथील शिवस्मारक सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. अखिल भारतीय क्रीडा भारतीचे महामंत्री राजाजी चौधरी, शिक्षण प्रसारक मंडळी शाळा समितीचे अध्यक्ष सुरेशबाबू मंकणी, क्रीडा भारती पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विजय पुरंदरे आणि उपाध्यक्ष ज्ञानेश्वर म्याकल यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

याच कार्यक्रमात कबड्डी क्षेत्रासाठी दीर्घकाळ योगदान देणारे क्रीडा संघटक डॉ. विलास हारपाळे यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच क्रिकेटचे ज्येष्ठ खेळाडू कुबेर तथा के. टी. पवार, निवृत्त शारीरिक शिक्षण संचालक संतोष गवळी यांचाही विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

क्रिकेट, कबड्डी आणि खो-खो या खेळांच्या प्रसारासाठी योगदान देणारे प्रशिक्षक प्रकाश कंपली, नवनाथ माने (करमाळा) तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एस.आर.पी. कॅम्पचे मुख्याध्यापक पुंडलिक कलखांबकर यांचाही पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

साईश्वर गुंटूकची आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी

साईश्वर गुंटूक हा आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त खेळाडू असून त्याच्या नावावर सलग चार वेळा गिनीज बुकमध्ये नोंद झाल्याची माहिती देण्यात आली आहे. जगातील सर्वात



लहान वयातील अल्ट्रारनर आणि अल्ट्रासायकलिस्ट म्हणून त्याची ओळख आहे. त्याने आतापर्यंत एकूण ३५७ मॅरेथॉन पूर्ण केल्या आहेत. वयाच्या सातव्या वर्षी उणे चार अंश सेल्सिअस तापमानात २१ किलोमीटर धावण्यासह १६ हजार ८१६ फूट उंचीची डोंगरी चढाई करण्याची उल्लेखनीय कामगिरी त्याने केली आहे.

श्रद्धा गुंटूकची राष्ट्रीय विक्रमाला गवसणी

श्रद्धा केशव गुंटूक हिनेही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिला गुजरातचा 'बेस्ट ॲथलीट ऑफ द इयर २०२३' पुरस्कार, महाराष्ट्र रत्न २०२४ हा सन्मान मिळाला आहे. तसेच २०२६ मध्ये ५ किलोमीटर धावण्याच्या कामगिरीची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, वयाच्या आठव्या वर्षी ८१ किलो वजन उचलून तिने राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे.

संध्याराणी बंडगर यांची टेनिसमध्ये चमकदार कामगिरी

संध्याराणी गणेशराज बंडगर या आंतरराष्ट्रीय लॉन टेनिसपटू असून त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बी.एस्सी. (गणित) पदवीधर असलेल्या संध्याराणी यांनी २०१६ पासून शासकीय सेवेत उत्कृष्ट कामगिरी करतानाच क्रीडा क्षेत्रातही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. ऑल इंडिया सिव्हिल सर्व्हिसेस टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत त्यांनी अनेक सुवर्ण आणि रौप्य पदके पटकावली आहेत.

आश्लेषा बागडेची कॉमनवेल्थ स्पर्धेसाठी निवड

आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आश्लेषा बागडे हिनेही आपल्या कामगिरीने देशाचा नावलौकिक वाढविला आहे. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्ली येथे झालेल्या कॉमनवेल्थ गेम्सच्या निवड चाचणीत तिची निवड झाली आहे. दक्षिण आफ्रिकेत होणाऱ्या या स्पर्धेत ती भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. यापूर्वीही तिने आशियाई चॅम्पियनशिपमध्ये पदक मिळवून देशाला गौरव मिळवून दिला आहे.

खेळाडूंच्या यशामागे आईने घेतलेले कष्ट, दिलेले प्रोत्साहन, त्याग आणि संस्कार यांचे मोठे योगदान असते. अशा मातांचा सन्मान करून त्यांच्या कायार्ची दखल घेण्याचा क्रीडा भारतीचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा भारतीचे मंत्री राजेश कळमणकर यांनी केले आहे.

PRECISION FOUNDATION

प्रिसीजन गप्पा

पर्व १८ वे

रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२६

प्रख्यात संगीतकार **डॉ. सलील कुलकर्णी** यांच्या
गेल्या ३० वर्षांच्या संगीतमय प्रवासाचा मागोवा आणि त्यांची लोकप्रिय गाणी





कलाकार
शुभंकर कुलकर्णी आणि
डॉ. सलील कुलकर्णी



संवादक
मा. अश्विन रानडे

सहगायिका
मा. सन्मिता धापटे-शिंदे

हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर
वेळ : संध्याकाळी ६.२५ वाजता

संपादकीय

अनुदानाचा वर्षाव; कर्जाला बळ!

केंद्र सरकारने रब्बी हंगाम २०२६-२७ साठी खत अनुदानात मोठी वाढ केली. प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील सूक्ष्म उद्योग कर्ज हमी निधीला पाच वर्षांसाठी मुदतवाढ दिली. या हजारो कोटी रुपयांचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत, तसेच जाचक अटी दूर करून खऱ्या नवउद्योजकांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचवणे, हेच सरकारसमोरील खरे आव्हान असेल.

जागतिक भूराजकीय अस्थिरता आणि पुरवठा साखळीतील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत अर्थव्यवस्थेचे दोन सर्वांत महत्त्वाचे आधारस्तंभ म्हणजे शेती आणि सूक्ष्म उद्योग क्षेत्र सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेले दोन ताजे निर्णय धोरणात्मकदृष्ट्या हे अत्यंत महत्त्वाचे ठरतात. रब्बी हंगाम २०२६-२७ साठी ६२,३७० कोटी रुपयांचे खत अनुदान मंजूर करून डीएपी खताच्या ५० किलोच्या गोणीचा दर १,३५० रुपयांवर कायम ठेवण्याचा निर्णय आणि त्याच वेळी प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सूक्ष्म उद्योगांसाठीच्या कर्ज हमी निधीला पुढील पाच वर्षांसाठी मुदतवाढ देत पाच हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करणे, ही दोन्ही पावले ग्रामीण आणि निमशहरी अर्थचक्राला गती देणारी आहेत. एका बाजूला शेतीचा उत्पादन खर्च नियंत्रणात ठेवून बळीराजाला दिलासा देणे आणि दुसऱ्या बाजूला विनातारण कर्जपुरवठा सुलभ करून नवउद्योजकांना बळ देणे, असा दुहेरी उद्देश या निर्णयांमागे स्पष्टपणे दिसतो.

भारतीय शेती सध्या दुहेरी संकटाचा सामना करत आहे. डिझेल, बियाणे, कीटकनाशके आणि मजुरीचे दर सातत्याने वाढत असताना शेतमालाला किफायतशीर भाव मिळण्याची शाश्वती कमीच राहते. अशा स्थितीत रब्बीच्या पेरणीच्या ऐन हंगामात खतांचे दर वाढले असते, तर शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असते. पश्चिम आशियातील तणाव आणि रशिया-युक्रेन संघषार्चे पडसाद अद्यापही आंतरराष्ट्रीय खत व कच्च्या मालाच्या बाजारावर उमटत आहेत. भारत आपल्या स्फुरद आणि पालाशयुक्त खतांच्या गरजेसाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असल्याने जागतिक दरवाढीचा थेट फटका देशांतर्गत बाजारपेठेला बसतो; मात्र सरकारने मागील रब्बी हंगामाच्या तुलनेत यंदा अनुदानात तब्बल २४,४१८ कोटी रुपयांची वाढ करून हा वाढीव आर्थिक भार स्वतःच्या तिजोरीवर घेतला आहे.

पोषक तत्त्व आधारित अनुदान योजनेअंतर्गत नत्र, स्फुरद, पालाश आणि गंधकाच्या प्रतिकिलो दरांत केलेली सुधारणा ही काळाची गरज होती. खतांचे दर स्थिर राहिल्यास शेतीचा उत्पादन खर्च मर्यादित राहतो आणि त्यातून अंतिमतः अन्नधान्य महागाई नियंत्रणात राहण्यास मदत होते. त्यामुळे खत अनुदान हा केवळ तिजोरीवरील खर्च न मानता अन्नसुरक्षा आणि ग्रामीण क्रयशक्ती टिकवून ठेवण्यासाठीची आवश्यक गुंतवणूक मानली पाहिजे; परंतु धोरणात्मक पातळीवर हजारो कोटी रुपयांची तरतूद करणे आणि प्रत्यक्षात शेताच्या बांधावर उभ्या असलेल्या शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळणे यांत आजही मोठी दरी आहे. दरवर्षी पेरणीच्या काळात खतांच्या टंचाईच्या तक्रारी, विक्री केंद्रांबाहेरील लांबच लांब रांगा, काळाबाजार आणि छापील किमतीपेक्षा अधिक दराने होणारी विक्री हे चित्र बदललेले नाही. अनेकदा खतांसोबत इतर अनावश्यक कृषी निविष्ठा खरेदी करण्याची सक्ती विक्रेत्यांकडून केली जाते. आधार संलग्न विक्री यंत्रणा कार्यान्वित असूनही साठेबाजी आणि मध्यस्थांची साखळी पूर्णपणे मोडीत निघालेली नाही. खतांचा हा अतिरिक्त बोजा सरकार उचलत असेल, तर त्याची फळे नफेखोरांच्या पदरात पडू नयेत, यासाठी पुरवठा साखळीवर कडक डिजिटल आणि प्रत्यक्ष देखरेख ठेवणे अनिवार्य आहे. त्यासोबतच, रासायनिक खतांचा असंतुलित वापर कमी करून सेंद्रिय पर्यायांना चालना देणे आणि खत उत्पादनात देशाला आत्मनिर्भर बनवणे, हे दीर्घकालीन धोरणही तितक्याच गांभीर्याने पुढे न्यावे लागेल.

कृषी क्षेत्रासोबतच सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचे दुसरे मोठे रोजगारनिर्मिती केंद्र आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने सोळाव्या वित्त आयोगाच्या कालावधीसाठी म्हणजेच २०३१ पर्यंत सूक्ष्म उद्योग कर्ज हमी निधी योजना कायम ठेवण्याचा घेतलेला निर्णय लहान व्यावसायिकांसाठी मोठा आधार ठरणार आहे. पाच हजार कोटी रुपयांच्या या निधीच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत १२.६ लाख कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, बँका आणि वित्तीय संस्थांसाठीचे वार्षिक कर्ज हमी शुल्क एक टक्क्यांवरून शून्य पूर्णांक पंचाहत्तर टक्क्यांपर्यंत कमी केल्याने बँकांचा संकोच कमी होऊन लहान उद्योजकांना विनातारण कर्ज मिळण्याचा मार्ग अधिक सुकर होईल. सप्टेंबर २०२६ पर्यंत मुद्रा योजनेअंतर्गत ६० कोटींहून अधिक कर्जे मंजूर होऊन ४३ लाख कोटी रुपयांहून अधिक निधी वितरित झाला आहे, ही आकडेवारी या योजनेची व्याप्ती दर्शवते.

तथापि, कर्जाच्या आकड्यांच्या पलीकडे जाऊन या योजनेच्या वास्तविक परिणामांचे मूल्यमापन करणे गरजेचे आहे. मुद्रा योजनेतून वितरित झालेल्या कर्जांपैकी मोठा हिस्सा हा अतिशय लहान रकमेच्या शिशू गटातील कर्जांचा असतो. या निधीतून खरोखरच किती नवीन उद्योग उभे राहिले, किती जणांना शाश्वत रोजगार मिळाला आणि किती व्यवसाय कर्जाच्या ओझ्यातून बाहेर पडून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाले, याचा सखोल लेखाजोखा मांडला गेला पाहिजे. अनेकदा बँकांकडून कागदपत्रांची क्लिष्ट पूर्तता मागितली जाते किंवा थकीत कर्जाच्या भीतीने पात्र लाभार्थ्यांना डावलले जाते. दुसरीकडे, अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण वाढू नये म्हणून कर्ज वितरणासोबतच नवउद्योजकांना आर्थिक साक्षरता, बाजारपेठेची जोडणी आणि तांत्रिक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. एकंदरीत, शेती आणि सूक्ष्म उद्योग या दोन्ही क्षेत्रांचे हितसंबंध परस्परांशी घट्ट जोडलेले आहेत. शेतकऱ्याच्या हातात चार पैसे शिल्लक राहिले, तरच ग्रामीण बाजारपेठेत मागणी निर्माण होते आणि त्यातूनच लहान व्यापारी व सूक्ष्म उद्योगांना चालना मिळते. जागतिक अनिश्चिततेच्या काळात सरकारने दाखवलेली ही आर्थिक संवेदनशीलता स्वागतार्ह असली, तरी तिचे यश हे केवळ घोषणांच्या भव्यतेवर नव्हे, तर शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणाऱ्या पारदर्शक अंमलबजावणीवरच अवलंबून राहणार आहे.

या दोन्ही योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वयालाही विशेष महत्त्व आहे. खतांच्या उपलब्धतेचे नियोजन करताना जिल्हानिहाय मागणी, पिकांची पद्धत आणि पेरणीचे क्षेत्र यांचा अचूक अंदाज घेणे आवश्यक आहे. केवळ अनुदान मंजूर करून भागणार नाही, तर प्रत्येक शेतकऱ्याला योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खत उपलब्ध होईल, याची खात्री करावी लागेल. त्याचप्रमाणे मुद्रा योजनेतील कजार्चा लाभ ग्रामीण भागातील महिला उद्योजक, तरुण आणि पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या कारागिरांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचवणे गरजेचे आहे.

डिजिटल अर्ज प्रक्रिया सुलभ करणे, कर्ज मंजुरीतील विलंब कमी करणे आणि लाभार्थ्यांना व्यवसायवृद्धीसाठी मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, यावर भर दिला पाहिजे. शेती आणि उद्योग क्षेत्रातील या आर्थिक पाठबळाचा उपयोग केवळ तात्पुरता दिलासा देण्यासाठी न होता उत्पादनक्षमता, रोजगारनिर्मिती आणि स्थानिक बाजारपेठांची क्षमता वाढवण्यासाठी झाला, तरच या निर्णयांचे व्यापक आर्थिक लाभ देशाला मिळू शकतील.

स्क्रीनवर गेम... वास्तवात क्राइम..!

अल्फा पिढीच्या बालमनात नेमकं चाललंय तरी काय ?

हातात मोबाईल, डोक्यात सोशल मीडिया, डोळ्यांसमोर आभासी जग आणि मनात वाढता एकटेपणा... आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात घडणारी जेन झी पिढी नेमकी प्रगत होत आहे की मानसिकदृष्ट्या भरकटत आहे ? आयुष्य कसे जगावे याबद्दल त्यांची मते स्पष्ट आहेत. या जेन झीच्या चार पावलं पुढं अल्फा पिढी दिसते. ज्या वयात हातात पाटी-पेन्सिल असावी, डोळ्यांत भविष्याची स्वप्ने असावीत आणि मनात प्रेम, माया, आपुलकीचे भाव असावेत, त्याच वयात काही मुलांच्या मनात हिंसा, द्वेष, सूड, विकृत विचार आणि गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होत असतील, तर हा केवळ चिंतेचा विषय नाही, तर संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारा प्रश्न आहे. कारण पंचकुलाच्या एका शाळेत तिसरीत शिकणाऱ्या अल्फा पिढीच्या मुलाने केजीमध्ये शिकणाऱ्या मुलीला अत्यंत निर्दयीपणे मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. मुलाच्या मारहाणीत मुलगी रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध झाली, पण तरीही मुलगा तिला मारहाण करत होता. हा व्हिडिओ बघितल्यावर तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या आठ वर्षांच्या मुलांमध्ये एवढे क्रौर्य कुठून आले? का आले? या प्रश्नाने त्याच्या पालकांचीच नाही तर सरकारचीही झोप उडवली आहे. मुलाला पब्जी आणि तस्सम हिंसक व्हिडिओ गेम्स खेळण्याचे व्यसन जडल्याचे प्राथमिक माहितीत समोर आले आहे. त्याचेच हे साईड इफेक्ट्स असल्याचा त्याच्या कुटुंबाचा दावा आहे. अशा अनेक घटना घडत आहेत.

अल्फा पिढीकडून घडलेले गुन्हे जरी गंभीर असले तरी त्यांना शिक्षा होणे शक्य नाही. त्यामुळे समुपदेशन करून त्यांना सोडून देण्यात येऊ शकते, पण मुळात गुन्हेगारीच्या वाटेवर पाऊल टाकलेल्या या मुलांचे समुपदेशन करून त्याची मानसिकता बदलता येणार का? त्याच्यात तयार होत असलेल्या सैतानाला आवरता येणार का? हाच प्रश्न आहे. आपल्या देशात आजही अल्पवयीन गुन्हेगारांना कडक शिक्षा केली जात नाही. सुधारण्याची संधी दिली जाते. पण जेवढी मुलं पुढे जाऊन मोठे गुन्हे करतात, त्यांची पाळंमुळं लहानपणातच दडलेली असतात, असे मानसोपचारतज्ज्ञांनीही स्पष्ट केलेले आहे. आज शहरात व ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांच्या हातून गंभीर गुन्हे घडतात. कुठे भरधाव गाडीखाली निष्पाप जीव तर कुठे मित्रच मित्राचा जीव घेतोय, तर कुठे किरकोळ वादातून हत्या केली जाते. कुठे टोळीयुद्धात अल्पवयीन मुलांचा वापर केला जातो. लहानपणी हिंसक असलेली



मुलं पुढे जाऊन गुन्हेगार बनतात, हे अनेक घटनांमधून पुढे आले आहे. यामुळे आपण नक्की कोणता समाज घडवत आहोत. मुलांना फक्त झेन जी, अल्फा, बिटा नाव देऊन त्यांची स्टेट टॅग स्वीकारून आपण आपली जबाबदारी टाळू शकत नाही.

अनेक जेन झी व अल्फा पिढी पब्जी आणि इतर हिंसक व्हिडिओ खेळून मानवी संवेदना गमावून बसतात. रक्त येईपर्यंत कोणाला मारणं, त्याच्यासाठी सामान्य बाब झाली आहे. कारण ते रोज पब्जीमध्ये असेच खेळ खेळतात. त्यातूनच जीवघेणे हाल्ले होत आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, भारतात अल्पवयीन मुलांनी केलेल्या गुन्ह्यांमध्ये म्हणजेच बालगुन्हेगारीमध्ये ११.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. संपूर्ण देशाबद्दल बोलायचं झालं तर अल्पवयीन गुन्हेगारीशी संबंधित गुन्ह्यांचा आकडा गेल्या वर्षी ३९,३६४ होता तो आता वाढून ३४,८७८ वर पोहोचला आहे. म्हणजेच दर एक लाख लोकसंख्येमागे अल्पवयीन गुन्ह्याचे प्रमाण ७.९ वरून ८.९ पर्यंत वाढले आहे. मुख्य म्हणजे यातील अल्पवयीन मुलांमधील ७७.७ टक्के ते ८० टक्के मुलं ही १६ ते १८ वर्षे वयोगटातील आहेत. दरोडा, प्राणघातक हल्ला, विनयभंग, छेडछाड आणि लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यांत या मुलांचा आकडा वाढतोय.

हल्लीची मुलं सोशल मीडिया फ्रेंडली आहेत. त्यामुळे पैशाचे आमिष दाखवत अनेक भामटे या मुलांचा वापर सायबर गुन्ह्यांतही करत आहेत. काही ठिकाणी अमली पदार्थांच्या तस्करीबरोबरच शरीर विक्रीसाठीही या मुलांचा वापर केला जात आहे. दरम्यान, अल्पवयीनांकडून होणाऱ्या गुन्ह्यांत बिहार आणि महाराष्ट्र अव्वल आहेत. बिहारमध्ये १७७ टक्क्यांची वाढ झाली आहे तर दिल्लीत सर्वाधिक बालगुन्हे घडत आहेत. आतापर्यंत २,३०६ गुन्हे अल्पवयीन गुन्हेगारीचे आहेत. तर अल्पवयीन गुन्ह्यांत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. देशातील एकूण बालगुन्हेगारीच्या १२ टक्के गुन्हे फक्त महाराष्ट्रात घडतात. ही धक्कादायक माहिती या अहवालातून समोर आली आहे. सर्वांत सुरक्षित राज्य असलेले महाराष्ट्र आज बिहारच्या बरोबरीने आहे. तज्ज्ञांच्या मते यामागे अनेक कारणे जरी असली तरी डिजिटलच्या या काळात मुलांवर सोशल मीडियाचा, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा सर्वाधिक प्रभाव आहे. इंटरनेट, ओटीटीवर सहज उपलब्ध होणाऱ्या हिंसक आणि अश्लील कंटेंटमुळे नकळत्या वयात उत्सुकतेपोटी काही मुलं गुन्हे करू लागली आहेत. आपण चुकीचे काही करतोय याची जाणीवदेखील त्यांना नसते. फक्त अनुभव, एक्साइटमेंटसाठीही काहीजण गुन्हे करत आहेत. तसेच शहरी भागात मुलं अमली पदार्थांच्या आहारी जाताना दिसतात. त्यातून पैशांसाठी चोरी, दरोडे घालणे असे गुन्हे त्यांच्याकडून घडू लागले आहेत. तर काही वेळा गुन्हेगारांच्या टोळ्या या मुलांचा वापर करत असल्याने मुलांना आपण गुन्हेगारीच्या विळख्यात कधी सापडलो ते देखील कळत नाही. ही आजची परिस्थिती आहे.

साधारण 2010 नंतर जन्मलेली ही पिढी तंत्रज्ञानाच्या कुशीत वाढत आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनली आहेत. जगभरातील माहिती त्यांच्या बोटांच्या टोकावर आहे; पण या माहितीचा योग्य वापर करण्याची समज त्यांच्या मनात विकसित होत आहे का ? मुलांच्या हातात मोबाईल आहे, पण हात धरून चालवणारे पालक कुठे आहेत? इंटरनेटवर हजारो मित्र आहेत, पण मनातले दुःख ऐकणारा मित्र कुठे आहे ? माहितीचा महासागर आहे, पण योग्य-अयोग्य ठरवण्याची विवेकबुद्धी कुठे आहे ? एक विचार करायला लावणारा प्रश्न आपण अल्फा पिढीला आधुनिक तंत्रज्ञान देत आहोत; पण त्याचबरोबर माणुसकी, संस्कार, संवेदना आणि विवेक देत आहोत का ?

प्रा. काटकर
तात्यासाहेब शिवाजी
9226144836 अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

पान १ वरून

माजी संचालकांना दुहेरी दणका...

केडरच्या निवडणुकीतही ११ उमेदवारांचे अर्ज बाद...

जिल्हा देखरेख संघाच्या (केडर) १६ जागांसाठी १०२ उमेदवारांनी १०९ अर्ज दाखल केले होते. छाननीत सहकार कायदा कलम ८८ मधील कारवाईमुळे माजी आमदार संजय शिंदे, दिलीप माने, जयवंतराव जगताप, सुरेश हसापुरे, बबनराव आवताडे आणि दिवंगत भाई एस. एम. पाटील यांचे पुत्र सुरेश पाटील (वारस म्हणून) असे सहा, तर कायद्यातील इतर तरतुदी, दाखला नसणे व सचिवांची खोटी सही या कारणांमुळे पाच असे एकूण ११ उमेदवारांचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी बाद केले. छाननीत उमेदवारांची कायदेशीर बाजू ॲड. उमेश मराठे व ॲड. वैभव मराठे यांनी मांडली.

तालुक्यांतील समीकरणे...

उत्तर सोलापूरमधून माजी आमदार दिलीप माने व तुकाराम गुंड यांचे अर्ज बाद झाल्याने सिद्धाराम चाकोते आणि चंद्रकांत म्हेत्रे यांच्यात संधीसाठी चुरस आहे. दक्षिण सोलापूरमधून सुरेश हसापुरे व नागप्पा बनसोडे यांचे अर्ज नामंजूर झाले असून, जिल्हा बँकेत आधीच संधी मिळालेले श्रीदीप हसापुरे केडरमध्ये काय निर्णय घेतात, याकडे लक्ष लागले आहे; त्यांनी माघार घेतल्यास इंदुमती अलगोंड-पाटील यांना संधी मिळू शकते. दरम्यान, बाद उमेदवारांना कलम १५३ अ अंतर्गत तीन दिवसांत पुणे विभागीय सहनिबंधकांकडे अपील करता येणार आहे. पात्र उमेदवारांची यादी सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होईल.

राज्यावरील दुष्काळाचे सावट...

दुष्काळी परिस्थिती दूर होऊन चांगला पाऊस पडावा, बळीराजावरील संकट दूर व्हावे आणि त्याच्या जीवनात सुख-समाधानाचे दिवस यावेत, असे साकडे पांडुरंगाला घातल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी राज्य शासन प्रयत्न शील आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सर्व मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर तसेच त्यांच्या घरी जाऊन भेटी घेत आहेत. दिवाळीच्या काळात शासनाकडून आर्थिक मदत तत्परतेने वितरित करण्यात आली असून, दुष्काळी परिस्थितीत लागू असलेल्या विविध सवलतीही जाहीर करण्यात आल्या आहेत. आपत्तीच्या काळात शासन शेतकऱ्यांना तातडीने मदत करत असल्याचे त्यांनी सांगितले.

आषाढी व कार्तिकी यात्रेदरम्यान वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये दरवर्षी सुधारणा करण्यात येत आहेत. वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याकरिता शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात आहे. दर्शन मंडपासाठी आवश्यक असलेला अतिरिक्त २५ कोटी रुपयांचा निधी पर्यटन विभागामार्फत तत्काळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. पंढरपूर कॉरिडॉरचे काम सर्व संबंधितांना विश्वासात घेऊनच करण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

कार्तिकी यात्रेच्या नियोजनात जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, सूचनांची तत्परतेने अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तहसीलदार सचिन लंगुटे आणि मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण कुमार घम यांच्या कामाचे कौतुक केले. या अधिकाऱ्यांचा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी तत्परतेने आणि धडाडीने निर्णय घेत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी सुधाकर दशरथ शिंदे व त्यांच्या पत्नी प्रणिता सुधाकर शिंदे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मानाचे वारकरी शिंदे दाम्पत्याचा श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती व वस्त्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळातर्फे देण्यात येणारा एक वर्षाचा मोफत प्रवास पास त्यांना प्रदान करण्यात आला. मंदिर समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री शिंदे यांचाही सन्मान करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते मंदिर समितीच्या 'दैनंदिनी २०२७' चे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले, तर आभार कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मानले.

जनगणना २०२७ च्या कामास जिल्हा प्रशासनाने सर्वोच्च प्राधान्य द्यावे- मुख्य सचिव राजेश अग्रवाल



मुंबई : जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसंख्या गणनेचे काम अचूक, पारदर्शक आणि निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने या कामास सर्वोच्च प्राधान्य द्यावे. जनगणनेच्या माध्यमातून संकलित होणारी माहिती पुढील नियोजन आणि विविध विकासकामांसाठी महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी दिले.

जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी प्रधान जनगणना अधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद आज सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या आभासी उपस्थितीत झाले.

जनगणनेतील माहिती अचूक असणे महत्त्वाचे - डॉ. निरुपमा डांगे

संयुक्त सचिव (भारत सरकार) व मुख्य प्रधान जनगणना अधिकारी, महाराष्ट्र डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी जनगणनेतील माहिती अचूकपणे संकलित करण्याचे महत्त्व विशद केले. जनगणनेतील त्रुटींचा परिणाम मतदारसंघ पुनर्रचना, वैधानिक आरक्षण तसेच आगामी दशकातील लोकसंख्याविषयक मूलभूत आकडेवारीवर होऊ शकतो. त्यामुळे राज्यभरात तैनात करण्यात येणाऱ्या सुमारे २.८४ लाख प्रगणक व पर्यवेक्षकांनी प्रत्येक व्यक्तीची नोंद होईल, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी सांगितले.

बेघर व्यक्ती, वसतिगृहे, कारागृहे, हॉटेल्स, पेइंग गेस्ट निवासस्थाने तसेच दुर्गम आणि वंचित भागांतील लोकसंख्येची नोंद घेण्यावर विशेष भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली, प्रगणकांसाठी पीई मोबाइल ॲप, ऑनलाइन स्वयं-गणना आणि रिअल-टाइम देखरेख प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

शहरी भागातील आव्हानांचा विचार करून नियोजन करा - डॉ. के. एच. गोविंदराज

अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज यांनी शहरी भागातील जनगणनेदरम्यान येणाऱ्या आव्हानांकडे लक्ष वेधले. महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील सुमारे ५० टक्के लोकसंख्या शहरी भागात राहत असल्याने स्थलांतर, नागरिकांची सततची ये-जा, दाट वस्ती आणि शहरांचा विस्तार यांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बंद किंवा रिकाम्या घरांसाठी आवश्यकतेनुसार पुन्हा भेटी देणे, प्रगणकांची नियुक्ती व प्रशिक्षण वेळेत पूर्ण करणे, तसेच त्यांना आवश्यक सुविधा आणि मानधन उपलब्ध करून देण्यावर त्यांनी भर दिला.

प्रशिक्षण आणि पूर्वतयारी वेळेत पूर्ण करा - रणजित सिंग देओल

प्रधान सचिव व राज्य नोडल अधिकारी रणजित सिंग देओल यांनी जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्याच्या वेळापत्रकाची आणि राज्यातील तयारीची माहिती दिली. प्रगणक व पर्यवेक्षकांच्या नियुक्त्या, प्रशिक्षण आणि संबंधित प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तांनी जिल्हास्तरीय प्रशिक्षणात सहभागी होऊन कामकाजाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

जनगणना २०२७ चे राज्यातील वेळापत्रक

महाराष्ट्रात १० ते २४ जानेवारी २०२७ या कालावधीत नागरिकांना ऑनलाइन स्वयं-गणना पोर्टलद्वारे स्वतःची माहिती नोंदवता येणार आहे. त्यानंतर २५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन लोकसंख्या गणना करतील. २८ फेब्रुवारीच्या मध्यरात्री बेघर लोकसंख्येची गणना करण्यात येईल, तर १ ते ५ मार्च २०२७ या कालावधीत पुनरावलोकन फेरी होणार आहे.

या टप्प्यात नागरिकांची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक आणि आर्थिक माहिती संकलित करण्यासाठी ४० प्रश्नांची डिजिटल प्रश्नावली वापरण्यात येणार आहे. यामध्ये नाव, कुटुंबप्रमुखाशी असलेले नाते, लिंग, वय, वैवाहिक स्थिती, धर्म, जात, दिव्यांगत्व, मातृभाषा, शिक्षण, व्यवसाय, रोजगार आणि स्थलांतर यासंबंधी माहितीचा समावेश आहे.

परिषदेत जनगणना अधिनियम व नियम, पीई मोबाइल ॲप, एचएलबीसी आणि सीएमएमएस पोर्टल, गणना क्षेत्रांची निश्चिती, जनजागृती आणि देखरेख यासंबंधी तांत्रिक सत्रे घेण्यात आली. मास्टर ट्रेनर्स, जिल्हा व चार्ज अधिकारी आणि तांत्रिक सहाय्यकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले असून क्षेत्रीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण सुरू आहे. यानंतर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

परिषदेस नवी दिल्ली येथील भारताचे महानिबंधक कार्यालयाचे उपमहानिबंधक (सी अँड टी) जसपाल सिंग, सर्व विभागीय आयुक्त, राज्यातील प्रधान जनगणना अधिकारी, जनगणना कार्य संचालनालय, मुंबई तसेच महाराष्ट्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तेंव्हा चूल पेटेल



राब राबूनी मातीत
माती चिखला तुडवी
घरे तेजाळण्या सारी
छान पणत्या घडवी

सण दिवाळी दिव्यांचा
दिवे मांडले बाजारी
करा खरेदी पणत्या
मिळे संसारा उभारी

लख्ख पडेल प्रकाश
वीज दिव्यांचा अंगणी
पण माझा दिवा दिसे
दारी शुक्राची चांदणी

कष्टकरी या हातांना
आहे मदतीची आस
माझ्या पणती दिव्याने
घर शोभेल हो खास

जेंव्हा विकतील दिवे
तेंव्हा काळोख हटेल
दिवे करा हो खरेदी
माझी चुलही पेटेल



श्री. युवराज गोवर्धन जगताप
काटेगाव ताः बार्शी
जिल्हाः सोलापूर
8275171227

वात्रटिका

वफादार सेवक

चुरूचूरू बोलणारा पोपट
यांच्याकडे नि त्यांच्याकडे...
मालकाला बोलू नये कोणी
नसता निघतील वाभाडे...
पद नाही, नाही किंमत
प्रवक्ता म्हणून बोळवण...
तेवढेच बस होते त्याला
म्हणूनच करतो भनभन...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

विहीर दुर्घटनाग्रस्त मृतांच्या वारसांना प्रत्येकी सात लाखांची आर्थिक मदत

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मदतीचे धनादेश प्रदान



पंढरपूर, (कटूसत्य वृत्त): पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे झालेल्या विहीर दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना तसेच विजेच्या धक्क्याने मृत्यू झालेल्यांच्या वारसांना राज्य शासन आणि शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली. शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच लाख रुपये आणि शिवसेनेच्या वतीने प्रत्येकी दोन लाख रुपये, अशी एकूण सात लाख रुपयांची मदत देण्यात आली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथे संबंधित वारसांना मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.

आंबे येथील विहीर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तींचे वारस म्हणून रांजणी येथील राधा मंगेश मोरे, राणी सिद्धेश्वर घाडगे तसेच अनवली येथील सिंधू आबासाहेब घोडके आणि लक्ष्मी तानाजी घोडके यांना प्रत्येकी सात लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

तसेच, आंबे येथे दि. २९ जून २०२६ रोजी विजेच्या धक्क्याने लक्ष्मण नागणे व अलका नागणे यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या वारस वैभव नागणे यांनाही शासनाच्या वतीने प्रत्येकी तीन लाख असे एकूण सहा लाख रुपये आणि शिवसेनेच्या वतीने दोन लाख रुपये, अशी एकूण आठ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांना धीर दिला. दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने ही मदत सुपूर्द करण्यात आली.यावेळी आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तमराव जानकर, नगराध्यक्षा प्रणिती भालके, जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

घुमाण सायकल वारीचा प्रवास प्रेरणादायी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमाण (पंजाब) या सुमारे २ हजार ५०० किलोमीटरच्या सायकल वारीचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पंढरपूर येथे करण्यात आला. संत नामदेव महाराजांचे विचार आणि संत साहित्याचा प्रसार करणारी ही सायकल वारी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केले.

पालखी सोहळा पत्रकार संघ, भागवत धर्म प्रसारक मंडळ, श्री नामदेव दरबार कमिटी, श्री क्षेत्र घुमाण (पंजाब), सायकल रायडर्स असोसिएशन आणि समस्त नामदेव शिंपी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२२ पासून संत शिरोमणी श्री नामदेव महाराज रथयात्रा व सायकल वारीचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे पाचवे वर्ष आहे.

दि. २१ नोव्हेंबर रोजी सुरू झालेली ही रथयात्रा व सायकल वारी महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि पंजाब या पाच राज्यांतून प्रवास करून दि. १३ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र घुमाण येथे पोहोचणार आहे. तेथे सायकल वारीचा समारोप होणार आहे. त्यानंतर हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांतून प्रवास करीत दि. २१ डिसेंबर रोजी रथयात्रा पुन्हा श्री क्षेत्र पंढरपूर येथे दाखल होणार आहे.

या रथयात्रा व सायकल वारीमध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यांतील सुमारे १६० सायकल रायडर्स सहभागी झाले आहेत. यंदा सहभागी रायडर्सची संख्या सर्वाधिक असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली.

संत साहित्याचा प्रचार व प्रसार करण्यासोबतच आरोग्य संवर्धन, पर्यावरण संरक्षण, वृक्षारोपण, प्रदूषण नियंत्रण आणि शिक्षण यांसारख्या सामाजिक विषयांवर जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या शुभारंभप्रसंगी मंत्री भरतशेठ गोगावले, आमदार राजू खरे, पालखी सोहळा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष शंकर टेमघरे, उपाध्यक्ष सुभाष भांबुरे, सायकल रायडर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. सुभाष कोकणे, यांच्यासह सायकल रायडर्स उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले



पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी कार्तिकी शुद्ध एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी उपस्थित होते. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार केला.

विठ्ठलाच्या महापूजेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संतपूजा



पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केल्यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपुरातील वारकरी संप्रदायातील विविध महाराज मंडळींची संतपूजा केली.

पंढरपुरातील धुंडा महाराज देगलूरकर मठ येथे हा संतपूजेचा कार्यक्रम पार पडला.यावेळी विविध महाराज मंडळींचा सन्मान करून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. तसेच मासिक आनंदवारी या पुस्तकाचे प्रकाशन उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी संकटात आहे. अशा कठीण काळात कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्याचे काम संत-महंत आणि महाराज मंडळींनी करावे. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, यासाठी समाजप्रबोधनातून त्यांच्यामध्ये सकारात्मक विचार निर्माण करण्याची गरज आहे.

वारकरी संप्रदायाला समाजप्रबोधनाची मोठी परंपरा लाभली आहे. कीर्तन आणि प्रवचनातून शेतकऱ्यांना संकटाचा सामना करण्याचे बळ मिळू शकते. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून, बळीराजा या संकटातून लवकर बाहेर पडेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

शेतकरी बांधवांना धीर देण्याचे आणि त्यांच्यामध्ये जगण्याची उमेद निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य वारकरी संप्रदायाने करावे, अशी विनंतीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी महाराज मंडळींना केली.

मोहोळ रेल्वे स्थानकावरील बंद आरक्षण केंद्र पुन्हा सुरू करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- मोहोळ रेल्वे स्थानकावरील कोरोना महामारीपूर्वी सुरू असलेले रेल्वे आरक्षण केंद्र कोरोना काळानंतर बंद करण्यात आले आहे. त्यामुळे मोहोळसह परिसरातील प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, हे आरक्षण केंद्र तात्काळ पुन्हा सुरू करण्यात यावे, अशी मागणी ॲड. अविनाश काळे यांनी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे. मागणी मान्य न झाल्यास कार्यालयासमोर आंदोलन अथवा उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

मोहोळ हे तालुक्याचे महत्त्वाचे ठिकाण असून, मोहोळ रेल्वे स्थानकावर कोरोना महामारीपूर्वी आरक्षण केंद्र सुरू होते. मात्र, कोरोना काळानंतर हे केंद्र बंद करण्यात आले. परिणामी, मोहोळ तालुक्यासह परिसरातील प्रवाशांना रेल्वेचे आरक्षण करण्यासाठी सोलापूर किंवा कुर्डुवाडी येथे जावे लागत आहे. यामुळे प्रवाशांचा वेळ आणि पैसाही खर्च होत आहे.

अनेक प्रवासी ऑनलाइन पद्धतीने आरक्षण करतात. मात्र, तात्काळ तिकिटे मिळविताना अनेक अडचणी येतात. काही वेळा प्रतीक्षा यादीतील तिकिटे निश्चित होत नसल्याने प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. मोहोळ येथेच आरक्षण केंद्र सुरू झाल्यास परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होणार असून रेल्वेच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, सोलापूर विभागीय कार्यालयाच्या २७ जानेवारी २०२३ रोजीच्या SUR/C/Cog/568/2023 या पत्रानुसार आरक्षण केंद्र सुरू करण्याबाबत संबंधित स्टेशन व्यवस्थापकांना कळविण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही मोहोळ येथे आरक्षण केंद्र सुरू झालेले नाही, असे ॲड. काळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

या मागणीचा गांभीर्याने विचार करून मोहोळ रेल्वे स्थानकावरील बंद असलेले आरक्षण केंद्र तातडीने सुरू करावे, अन्यथा कायदेशीर मार्गाचा अवलंब करून संबंधित कार्यालयासमोर आंदोलन व उपोषण करण्यात येईल, असा इशारा ॲड. अविनाश काळे यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक, मुंबई तसेच मुख्य वाणिज्य प्रबंधक, मध्य रेल्वे यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

हक्काच्या पाण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील जाधववाडीकर आक्रमक



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील सीना-माढा उपसा जलसिंचन योजनेचे हक्काचे पाणी आर्थिक देवाणघेवाणीतून बेकायदेशीररीत्या वळवल्याच्या आरोपावरून माढा तालुक्यातील जाधववाडी (मो.) येथील ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

या प्रकाराला जबाबदार असणाऱ्या भीमा पाटबंधारे विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली असून, सर्वपक्षीय राजकीय नेत्यांना गावबंदी जाहीर करण्यात आली आहे.

दोन महिन्यांहून अधिक काळ शांततेत आंदोलन करूनही न्याय न मिळाल्याने ग्रामस्थांचा संयम सुटला आहे. मागण्या मान्य न झाल्यास आगामी सर्व निवडणुकांवर सामूहिक बहिष्कार टाकण्याचा तसेच गावातील शाळा आणि शासकीय कार्यालये बंद ठेवण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. गावात या संदभार्तील निषेधाचे फलक लावण्यात आले आहेत.

पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले..

जाधववाडी (मो.) हे गाव सीना-माढा उपसा सिंचन योजनेच्या वितरिका क्रमांक ८ च्या शेवटच्या टोकाला वसलेले आहे. गावाच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेला भापकर तलाव तसेच बैरागवाडी येथील सुर्वे तलाव हे पूर्णपणे या वितरिकेच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र, वरच्या भागातून सोडलेले पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचत नसल्याने शेती आणि जनावरांच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

टेंभुर्णी येथील पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी तुंबाळ आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी स्थानिक नेत्यांशी संगनमत करून कालवा बेकायदेशीररीत्या फोडल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ह्कालवा फोडून आमच्या हक्काचे पाणी मध्येच पळवण्यात आले आहे. नेते आणि अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळेच गाव पाण्यापासून वंचित राहिले आहे,ह्व अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली असून, कोणत्याही पक्षाच्या पुढाऱ्यांना गावात प्रवेश देऊ नये, असा ठाम निर्णय घेण्यात आला आहे.

तालुक्यात पाणीसंघर्ष तीव्र

दुष्काळी परिस्थितीमुळे माढा तालुक्यातील गावागावांत पाण्यासाठी संघर्ष तीव्र होताना दिसत आहे. यापूर्वी तुळशी येथील ग्रामस्थांनी पाण्यासाठी आंदोलन पुकारले होते, त्यापाठोपाठ आता जाधववाडीच्या ग्रामस्थांनी एल्गार पुकारला आहे. शेवटच्या टोकापर्यंत पाणी मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राष्ट्रमाता जिजाऊ स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरू करा

संभाजी ब्रिगेडची उपमहापौरांकडे मागणी



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील चार हुतात्मा चौकातील पुतळ्याजवळ राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांचे भव्य स्मारक लवकरात लवकर उभारण्यात यावे, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर मा. ज्ञानेश्वरी देवकर यांची त्यांच्या उपमहापौर कार्यालयात भेट घेण्यात आली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी यासंदर्भात लवकरच बैठक लावून हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले यावेळी महेश देवकर मनोज देवकर आधी उपस्थित होते.

यावेळी जिजाऊ स्मारकाच्या उभारणीबाबत चर्चा करून प्रलंबित प्रक्रिया लवकर पूर्ण करावी आणि स्मारकाच्या कामाला गती द्यावी, अशी मागणी करण्यात आली. राष्ट्रमाता जिजाऊ यांचे कार्य, त्यांचे विचार आणि स्वराज्यनिर्मितीतील योगदान पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे सोलापूर शहरात त्यांचे स्मारक उभारणे ही काळाची गरज असल्याचे संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

महापालिकेने यापूर्वी जिजाऊ स्मारकाच्या प्रस्तावाला मंजुरी दिलेली असताना आता पुढील कार्यवाही तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष स्मारक उभारणीचा मार्ग मोकळा करावा, अशी आग्रही मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आली.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनलदास वकील आघाडी जिल्हाध्यक्ष गणेश कदम नरेश मोहिते प्रकाश व्यवहारे दिलीप निंबाळकर आदी उपस्थित होते.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.

मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर

संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू



जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर

उमेश माने
मो. 9353370779

रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) महाराष्ट्राचे एक उपमुख्यमंत्री २) कविता, काव्य ३) खोदलेले खंदक ४) कमजोर ५) भारतीय क्रिकेट संघाचा ऐंशीच्या दशकातील कर्णधार ६) व्रण, ओळ (ग्रामीण भाषेत) ११) दुर्दशा, वाईट स्थिती, **अपेष्टा १२) उणीव, टंचाई १३) उजाड, ओसाड १५) काकाची पत्नी १७) कष्ट, परिश्रम १९) वतनाचा मालक २०) शिक्षा २२) एक म्हण-उथळ पाण्याला खळखळाट **२४) महाराष्ट्राचा पूर्व-दक्षिण जिल्ह्यांचा भाग २५) दोन मिनिटात तयार होणारी लहान मुलांच्या आवडीचा नेस्ले कंपनीचा पदार्थ २७) दु:ख (हिंदीत) २९) मराठी वर्षातील अकरावा महिना ३०) विक्रम गोखले, दिलीप प्रभावळकर अभिनीत राजकारणावरील चित्रपट ३१) विदेशी मद्य ३२) श्रीकृष्णाचा भाऊ ३३) बोलावणे, हाक ३७) लोकसभा सदस्य ३९) राष्ट्रवादीचे एक मंत्री-छगन **** ४२) संशय हिंदीत) ४३) जपानी जाड पैलवान ४५) विषमच्या विरूध्दार्थी ४७) होता जिवा म्हणून वाचला ** ४८) फटाक्याची माळ, शिक्षकांना या नावाने संबोधतात

आडवे शब्द : १) काँग्रेस सोडून भाजपात गेलेले नांदेडचे नेते ४) आ. नितेश राणे यांचा मतदारसंघ ७) नवरा मुलगा, आशिर्वाद ८) सीतापती ९) एक म्हण-सुंभ जळाला तरी ** जळत नाही १०) पाणी पिण्याची तीव्र इच्छा, तृष्णा १२) भवा उलट लिहा १४) भारतीय टीममधील अष्टपैलू खेळाडू-*** पंड्या १६) क्षण (हिंदीत) १७) स्वर्गातील एक अप्सरा १८) श्रीकृष्णाची आई २०) संगत, सोबत २१) दोघांमधील अंतर, फरक २३) मुस्लिम बांधवांचा एक पवित्र सण २६) गन उलट लिहा २८) तमाशातील कलावंत ३२) सुक्या मेव्यातील एक पौष्टीक घटक ३३) बारा गुणिले पाच ३४) वास्तू, निवास ३५) थंडीमध्ये गळ्याभोवती गुंडाळतात ३६) रूग्णालय ३८) चुलत्यांना वा मावशीच्या पतीस या नावाने संबोधतात ४०) मच्छर ४१) बे दुणे ४२) लाज ४४) गुलाम ४६) उत्तर महाराष्ट्रातील एक जिल्हा ४८) सर्व (हिंदीत) ४९) मुस्लिम बांधवांचा एक सण ५०) गुटख्याप्रमाणे एक अंमली पदार्थ ५१) भारतातील दक्षिणेकडील एक राज्य

सुडोकु - 105

			9			5	1	7
		5		2				
	9		5			8	2	4
3	7			9	2	1	4	
4		9		1		6	7	3
		1		3				8
6		3		8		4		9
				6				1
	8	4			1	7	6	

विहीर दुर्घटनाग्रस्त मृतांच्या वारसांना प्रत्येकी सात लाखांची आर्थिक मदत

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मदतीचे धनादेश वितरित

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे झालेल्या विहीर दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना तसेच विजेच्या धक्क्याने मृत्यू झालेल्यांच्या वारसांना राज्य शासन आणि शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली. शासनाच्या वतीने प्रत्येकी पाच लाख रुपये आणि शिवसेनेच्या वतीने प्रत्येकी दोन लाख रुपये, अशी एकूण सात लाख रुपयांची मदत देण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर येथे संबंधित वारसांना मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात आले.

आंबे येथील विहीर दुर्घटनेत मृत्यू झालेल्या व्यक्तींचे वारस म्हणून रांजणी येथील राधा मंगेश मोरे, राणी सिद्धेश्वर घाडगे तसेच अनवली येथील सिंधू आबासाहेब घोडके आणि लक्ष्मी तानाजी घोडके यांना प्रत्येकी सात लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

तसेच, आंबे येथे दि. २९ जून



२०२६ रोजी विजेच्या धक्क्याने लक्ष्मण नागणे व अलका नागणे यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या वारस वैभव नागणे यांनाही शासनाच्या वतीने प्रत्येकी तीन लाख असे एकूण सहा लाख रुपये आणि शिवसेनेच्या वतीने दोन लाख रुपये, अशी एकूण आठ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांना धीर दिला. दुर्घटनाग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक आधार देण्याच्या उद्देशाने ही मदत सुपूर्द करण्यात आली.

यावेळी आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तमराव जानकर, नगराध्यक्षा प्रणिती भालके, जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे उपस्थित होते.

म्हैसाळ सिंचन योजनेचे पाणी वितरिका क्रमांक २ द्वारे दक्षिण मंगळवेढ्याकडे सोडण्यास सुरुवात

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी म्हैसाळ सिंचन योजनेतून दक्षिण मंगळवेढ्यातील गावांना पाणी सोडण्याची सातत्याने मागणी व पाठपुरावा केला होता. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून, म्हैसाळ सिंचन योजनेचे पाणी वितरिका क्रमांक २ द्वारे दक्षिण मंगळवेढ्याकडे सोडण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

खासदार प्रणिती शिंदे यांनी दि. १४ जुलै २०२६ रोजी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मंगळवेढा तालुक्यातील शिष्टमंडळासह प्रत्यक्ष भेटून पत्र देऊन मंगळवेढा तालुक्यातील दक्षिण भागातील दुष्काळी पट्ट्यात म्हैसाळ योजनेचे पाणी सोडण्याची मागणी केली होती. म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचे पाणी जत तालुक्यात सोडण्यात आले असताना, मंगळवेढा



तालुक्यातील दक्षिण भागातील गावांनाही या योजनेचा लाभ मिळावा, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली होती.

विशेषतः वितरिका क्रमांक १, २ व उमदी वितरिकेमधून पाणी सोडल्यास मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना मोठा फायदा होईल, असे त्यांनी पत्रात नमूद केले होते. यामध्ये शिरनांदगी, मारोळी, सलगर बुद्रुक, सलगर खुर्द, हुन्नूर, लवंगी, आसबेवाडी यांसह दक्षिण भागातील इतर गावांना पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली होती.

आता वितरिका क्रमांक २ द्वारे पाणी सोडण्यास सुरुवात झाल्याने शिरनांदगी, मारोळी, महमदाबाद, चिखलगी, जंगलगी, सलगर, पडोळकरवाडी, हुन्नूर आदी गावांतील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. दुष्काळामुळे पिके आणि शेती अडचणीत आलेली असताना या पाण्यामुळे शेतीला मोठा आधार मिळणार असून, शेतकऱ्यांसाठी हे पाणी नवसंजीवनी ठरणार आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी केवळ आश्वासने न देता शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा करून प्रत्यक्ष पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहिलेल्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याबद्दल दक्षिण मंगळवेढ्यातील शेतकरी व नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

एम.आय.डी.सी. पोलिसांची धडाकेबाज कारवाई

घरफोडीसह मोटारसायकल चोरीचे ८ गुन्हे उघडकीस !



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या पथकाने केलेल्या प्रभावी तपासामुळे घरफोडीसह मोटारसायकल चोरीचे तब्बल ८ गुन्हे उघडकीस आले आहेत. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३ लाख १० हजार रुपये किमतीच्या मोटारसायकली जप्त केल्या असून, या प्रकरणी एका विधीसंघर्षित बालकासह दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १४/११/२०२६ रोजी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पो.उप.नि. श्री. अरबाज शेख व पथक पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम मोटारसायकल विक्रीसाठी अक्कलकोट रोडवरील बी.एस.एन.एल. टॉवरमागील बाजूस मैदानात पत्राशेडच्या आडोशाला घेऊन येणार आहे. त्यानुसार पथकाने सापळा रचून त्या इसमास ताब्यात घेतले आणि त्याची चौकशी केली. चौकशीत त्याने मोटारसायकल चोरीची कबुली देत आपल्या साथीदाराची माहिती दिली.

पुढील तपासात या प्रकरणात एका विधीसंघर्षित बालकाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्या बालकाकडे अधिक चौकशी केली असता, त्याने विविध ठिकाणांहून मोटारसायकली चोरल्याची कबुली दिली. या तपासातून एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यासह सोलापूर शहरातील इतर पोलीस ठाण्यांतील मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघड झाले.

याशिवाय, दिनांक २०/११/२०२६ रोजी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या पथकाने गोपनीय बातमीच्या आधारे घरफोडीच्या गुन्ह्याचाही छडा लावला. यामध्ये ह्यनागोजी बाबा पठाण व सुहास अर्जुन दानाह्ण यांच्या घरातून चोरी झालेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, या प्रकरणी विधीसंघर्षित बालकासह एकूण २ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त श्री. एम. राजकुमार, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ/मुख्यालय) श्री. गौहर हसन, सहायक पोलीस आयुक्त (विभाग-१) श्री. संतोष गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अरविंद देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सचिन यादव, पो.उप.नि. अरबाज शेख आणि गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी केली आहे.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खा प्रणिती शिंदे यांचा अक्कलकोट तालुक्यात गावभेट दौरा

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खासदार प्रणिती शिंदे यांनी अक्कलकोट तालुक्यातील काझी कणबस व सुलतानपूर या गावांना भेट देऊन गावभेट दौऱ्यादरम्यान स्थानिक नागरिक, शेतकरी आणि ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी गावातील वीज, रस्ते, पाणी यांसह विविध पायाभूत सुविधांबाबतच्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या तातडीने सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामीण भागातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेतला. मतदारसंघातील अनेक गावांना सध्या भीषण दुष्काळाचा सामना करावा लागत असून पाणीटंचाई, शेतीचे प्रश्न, सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर त्यांनी भर दिला.

यावेळी शेतकऱ्यांच्या ऊस दराच्या प्रश्नावर बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, आज ऊस दरासाठी शेतकरी मायबाप रस्त्यावर उतरला आहे. एका बाजूला खतांच्या किमती वाढल्या आहेत, सिंचनासाठी पाणी सोडण्याबाबत अनिश्चितता आहे, पीक विम्याचा लाभ वेळेत मिळत नाही आणि दुसरीकडे काही साखर कारखान्यांकडून अद्याप शेतकऱ्यांची थकीत ऊस बिले अदा करण्यात आलेली नाहीत. आधीच दुष्काळामुळे शेतकरी अडचणीत असताना या समस्यांमुळे त्यांच्यावर दुष्काळात तेरावा महिना अशी परिस्थिती ओढवली आहे.

शेतकरी संकटात असताना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही माझी



जबाबदारी आहे. थकीत ऊस बिले मिळवून देण्यासाठी मी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांची ही लढाई माझीही लढाई असून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेवटपर्यंत संघर्ष करेन. आम्ही तुमच्यासोबत आहोत. शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत आवाज उठविणार, अशी ग्वाही खासदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी दिली.

प्रत्येक गावात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देणे, शेतकऱ्यांना आधुनिक शेतीसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण भागातील तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यापुढील काळात पाणी, शेती आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देऊन लोकहिताची आणि शाश्वत विकासाची कामे करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही खासदार शिंदे यांनी स्पष्ट केले.

यावेळी देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, राहुलजी गांधी यांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे आणि त्यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील तरुणांनी सुरू केलेल्या आंदोलनांमुळे मोदी सरकार घाबरले आहे. देशातील तरुणांचे प्रश्न, लोकशाहीचे संरक्षण आणि जनतेच्या हक्कांसाठी राहुलजी गांधी सातत्याने संघर्ष करत असून काँग्रेस पक्षही जनतेच्या प्रश्नांवर ठामपणे लढत राहील.

या गावभेट दौऱ्यामुळे स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांना आपल्या समस्या थेट खासदारांसमोर मांडण्याची संधी मिळाली. नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास खासदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामस्थांना दिला.

यगावभेट दौऱ्यात अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, युवक अध्यक्ष गजानन जकीकोरे, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, माजी सतपंच रावसाहेब धर्मसाले, हर्षदीप गायकवाड, तानाजी धर्मसाले, राजू मोरे, धनंजय चौगुले, मधुकर पाटील, निरंजन मावरकर, गणेश शिंदे, अवधूत धर्मसाले, मल्लिनाथ बंडगर, संजय प्रचंडे, बसवराज प्रचंडे, गणेश जाधव, लाडलेसाहेब घाटे, शिवराज ब्याले, गुड्डू मुल्ला यांच्यासह ग्रामस्थ शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनाने सहकार विकास पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूरच्या संचालक मंडळ निवडणूक २०२६ निमित्त भारतीय जनता पार्टी व मित्रपक्ष पुरस्कृत सहकार विकास पॅनलच्या प्रचार दौऱ्याचा शुभारंभ आपल्या अक्कलकोट शहरातून करण्यात आला. यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांचे मनोभावे दर्शन घेऊन निवडणुकीसंदर्भातील प्रचार पत्रक महाराजांच्या पवित्र चरणी अर्पण केले आणि प्रचाराचा श्रीगणेशा केला. आगामी निवडणुकीत सहकार विकास पॅनलच्या माध्यमातून सहकार क्षेत्राला अधिक सक्षम करण्याचा आणि सभासदांच्या हिताला प्राधान्य देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.



या प्रसंगी मा. आमदार राजन मालक पाटील, मा. आमदार बबनदादा शिंदे, आ सचिन कल्याणशेट्टी, मा. आमदार दीपकआबा साळुंखे, सुरेश हसापुरे, रणजीत शिंदे, दिग्विजय बागल, प्रणव परिचारक यांच्यासह सहकार विकास पॅनलचे सर्व उमेदवार आणि मतदार उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत प्रचाराचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी आणि बँकेच्या उज्ज्वल वाटचालीसाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी दिसून आला. श्री स्वामी समर्थ महाराजांच्या आशीवार्दाने सहकार विकास पॅनलच्या सर्व उमेदवारांचा निशितच विजय होईल, याची खात्री आहे.

विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रात झालेली प्रगती हीच गुरूनांसाठी आनंदाची व अभिमानाची भेट आहे - तानाजीराव मगर

अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलूज (ता.माळशिरस) येथील सदाशिवराव माने विद्यालयातील सन १९९३-९४ साली इयत्ता बारावीत शिकलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दत्तात्रय दिक्षित, तानाजीराव मगर, दत्तात्रय खुसपे, बबनराव चव्हाण, डी.जे. राजमाने, पी.एल.धर्माधिकारी, लिट्ल फ्लॉवर ज्युनिअर कॉलजचे प्राचार्य तानाजी देशमुख (परळी वैजनाथ), डॉ. दिनेश जगताप (सासवड) अभिनेते अजय तपकीरे उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करून दिप प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी गुरूजनांचा शिष्यांनी यथोचित सत्कार करण्यात आला.



त्यानंतर शिक्षण घेतलेल्या मुला-मुलींनी जुन्या काळातील शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत काहींनी आनंदाच्या आठवणी सांगितल्या, काहींनी शिक्षण घेताना गरीबीवर मात करत तर काहींनी हसत खेळत शिक्षण पुर्ण केले आहे.या वर्गातील माजी विद्यार्थी स्वतःचा उद्योग व शेती व्यवसाय करत आहेत तर काही मुले उद्योगपती झाले असून ही मुले स्वतःच्या पायावर उभे आहेत.

या स्नेहमेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. त्याच बरोबर शिक्षकांच्या सानिध्यात ज्ञानाचे धडे घेतानाची आठवणी सर्वांच्या जाग्या झाल्या त्यामुळे काही जण भावूक झाले होते तर काही जणांच्या डोळ्याच्या काठावर अश्रू दाटून आले. गेलेले दिवस परत येत नसतात पण ज्या शाळेत शिकलो,ज्या गुरुजनांनी ज्ञानाचे धडे दिले. शाळेत शिकलेल्या आठवणी विसरता येत नाही.त्याच बरोबर अध्यापन केलेले शिक्षक सदैव स्मरणात रहातात. त्या गुरूजनांचे ऋणाची उतराई करण्यासाठीच स्नेहमिलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विनोद थोरात, संजाली कुलकर्णी (दुरूपकर), रोहिणी देशमुख, विठ्ठल चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुहास उरवणे तर आभार प्रदर्शन राजू कांबळे यांनी मानले.हा स्नेहमेळावा यशस्वी पार पाडण्यासाठी राजू निकम, जगदीश थोरात, शब्बीर शेख (चाचा), तानाजी माळी, राजू सरवदे, संतोष शिंदे, राजू कांबळे, संतोष पिसे, कांतीलाल शिंदे यांनी परिश्रम घेतले.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांचा वनवास संपणार

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या वतीने राज्यातील 969 कंत्राटी कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करणेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना संधटनेच्या वतीने निवेदन देण्यात आले.

याबाबत त्यांनी तातडीने कारवाई करण्याच्या सूचना उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास दिल्या आहेत.

पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात शासकीय महापूजेसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले असता शासकीय विश्रामधाम येथे कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड कार्याध्यक्ष सचिन जाधव, जलजीवन मिशन चे शंकर बंडगर, वॉश पीएमयु चे आनंद मोची यांनी भेटून निवेदन दिले. या प्रसंगी जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन, आमदार राजाभाऊ खरे, आमदार अभिजित पाटील, आमदार उत्तम जानकर, पंढरपूर चा नगराध्यक्षा प्रणिता भालके उपस्थित होत्या.

राज्यात जवजीवन मिशन अंतर्गत जिल्हा स्तर व तालुका स्तरावर गेल्या 14 वर्षा पासून कर्मचारी कार्यरत आहेत. तर स्वच्छ भारत मिशन अंतर्गत राज्यात २०५ कर्मचारी कार्यरत असल्याचे कृती समितीचे अध्यक्ष रमांकात गायकवाड यांनी सांगितले.



गेल्या वर्षी अपंग समावेशित शिक्षणचे दहा वर्षे सेवा पूर्ण झालेले साडेतीन हजार कर्मचारी आपण कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट केले आहेत.

जुलै 2026 मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत 3500 कंत्राटी कर्मचारी नियमित सेवेत सामावून घेतले आहेत,

मागील महिन्यात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत 14 हजार कर्मचारी आपण शासन सेवेत नियमित केलेले आहेत.

वरील सर्व विभाग हे आपल्याच मंत्र्याकडे आहेत. पाणी व स्वच्छता क्षेत्रात मागील 22 वर्षापासून कार्यरत असणारे 969 कर्मचारी यांची सेवा दहा वर्षापेक्षा अधिक सेवा झाली आहे. यांना आता आपण कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून पांडुरंगाचा आणखी चांगला आशीर्वाद घ्यावा असे कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी यांनी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पटवून सांगितले. वॉश पीएमयू च्या

कर्मचारी यांची सेवा पुर्वरत सुरू करणेची मागणी देखील या प्रसंगी करणेत आली. कृती समितीचे उपाध्यक्ष ऋषीकेश शिलवंत व उपाध्यक्ष बंडू हिवरे, अजय राऊत, दिलीप मस्के, निखील रौंदाळकर नागपूर यांचे सहकार्य मिळाले.

खासदार श्रींकात शिंदे यांचेशी सकारात्मक चर्चा

राज्य कृती समतीच्या वतीने खासदार श्रींकात शिंदे यांचेशी अध्यक्ष रमाकांत कायकवाज व कार्याध्यक्ष सचिन जाधव व शंकर बंडगर यांनी चर्चा करून प्रश्न समजावून सांगितला. केंद्राची बदलती धोरणे लक्षात घेता शासन सेवेत कायम करणेची मागणी करणेता आली. पुढीस आठवड्यात या वर मुंबई येथे बैठकीचे करण्यात आले असल्याचे खासदार शिंदे यांनी सांगितले.

रसिकांना घडले हिंदी चित्रपट गीतांतील मृदुल सौंदर्यशास्त्राचे दर्शन

प्रिसिजन गप्पांच्या दुसऱ्या दिवशी संस्मरणीय ठरले हिंदी सिनेमातील गाणी आणि किस्से

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- अत्यंत गाजलेल्या हिंदी चित्रपट गीतांच्या अर्थातील गोडवा, श्रवणीयता अन उत्तमोत्तम भारतीय संगीतकारांनी पडद्यावरील प्रसंग, व्याकरण, शब्दांचे अर्थ यांचा प्रचंड अभ्यास करून गीतांना लावलेल्या चालींचे स्वरमाधुर्य उलगडत डॉ. मृदुला दाढे - जोशी यांनी केलेल्या सादरीकरणामुळे रसिकांना हिंदी चित्रपट गीतांच्या मृदुल सौंदर्यशास्त्राचे दर्शन शनिवारी घडले. सोबतच विविध प्रकारचे किस्से आणि हिंदी सिनेमातील गीतांनी सोलापूरकरांना हिंदी सिनेमाच्या सुवर्णकाळाच्या आठवणींत नेले. निमित्त होते प्रिसिजन फाउंडेशनतर्फे हुतात्मा स्मृती मंदिरात आयोजित प्रिसिजन गप्पा या सांस्कृतिक सोहळ्याचे.

प्रिसिजन गप्पा च्या दुसऱ्या दिवशी प्रख्यात संगीत अभ्यासक आणि गायिका डॉ. मृदुला दाढे - जोशी यांचा 'रहे ना रहे हम' हा हिंदी संगीतकारांची गाणी आणि गप्पांचा कार्यक्रम झाला. हिंदी संगीताचा जणू चालता बोलता



संदर्भ ग्रंथ असलेल्या डॉ. मृदुला दाढे - जोशी यांनी आपल्या अभ्यासपूर्ण विवेचन आणि गीत सादरीकरणातून या सांगीतिक अन गप्पांच्या कार्यक्रमाला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले.

प्रारंभी प्रिसिजन कॅमशाफ्टचे चेअरमन यतीन शहा, प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा, प्रिसिजन कॅमशाफ्टचे कार्यकारी संचालक करण शहा, प्रिसिजन फाउंडेशनच्या संचालिका मयुरा दावडा - शहा आणि सहकाऱ्यांच्या हस्ते गायक, सहगायक आणि वादकांचा सन्मान करण्यात आला. माधव देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. मृदुला दाढे - जोशी यांना संवादक अभिजीत कुलकर्णी यांनी हिंदी सिनेमातील गाणी आणि घटनांवर बोलते केले. या कार्यक्रमात डॉ. मृदुला दाढे - जोशी यांनी हिंदी चित्रपटातील गाजलेली आणि रसिकांना अत्यंत भावणारी लोकप्रिय गाणी आपल्या खास शैलीत सादर केली. 'आयेगा, आयेगा आनेवाला', 'ये जिंदगी उसी की है जो किसीका हो गया', 'गोरे गोरे', 'चलते चलते' अशी अत्यंत मधुर चालींतील गाणी सादर करून रसिकांना सुरांवर डोलायला लावले. तर सहगायक निलेश निरगुडकर यांनी तुम्हारे 'जुल्फ के साये में', 'चौदवी का चांद', 'चलो एक बार फिरसे अजनबी बन जाये' अशी गीते सादर करून रसिकांच्या टाळ्या मिळवल्या. अभिजीत कुलकर्णी यांच्या बहारदार संवादाने कार्यक्रमात आणखीनच रंग भरला.

डॉ. मृदुला दाढे - जोशी यांनी संगीतकार खेमचंद प्रकाश, सी. रामचंद्र, मदन मोहन, रविशंकर शर्मा अशा महान कलाकृती निर्माण करणाऱ्या अनेक संगीतकारांच्या कलाकृतींमधील बारकावे दाखवून देत रसिकांना त्याच गाण्यांकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. संगीतकारांबरोबरच लता मंगेशकर, महंमद रफी यांच्या सारख्या गायकांनी गाण्याची उंची वाढविण्यासाठी कशाप्रकारे जीव ओतून ते गायले याचे बारकावे सांगितले. गाण्यांतील सूर, जागा, हरकती, मुरकी, ताना म्हणजे गाण्याचे सौंदर्य असते. मोरपीसातील प्रत्येक धागा वेगळा असतो. पण ते एकत्र आले की सुंदर मोरपीस बनते. अगदी त्याचप्रमाणे गाणे म्हणजे तरल मोरपीसासारखे असते, असा दाखला डॉ. मृदुला दाढे - जोशी यांनी देताच सोलापूरकरांनी प्रचंड टाळ्यांची दाद त्यांना दिली.

गायकांना कीबोर्डवर केदार परांजपे, तबल्यावर ऋषिराज साळवी, हँडसॉनीकवर दिगंबर मानकर तर साईड रिदमवर व्यंकटेश कुलकर्णी यांनी साथसंगत केली. या कार्यक्रमाची सहनिर्मिती उदय मटकर यांची होती.

डॉ. सलील कुलकर्णी यांच्या गायनाने आज प्रिसिजन गप्पांचा समारोप

विख्यात संगीतकार आणि गायक डॉ. सलील कुलकर्णी यांच्या 'कवितेचं गाणं होताना' या कार्यक्रमाने रविवारी प्रिसिजन गप्पांचा समारोप होणार आहे. त्यांच्या समवेत त्यांचे चिरंजीव शुभंकर कुलकर्णी आणि सन्मिता धापटे हे सहगायन करणार आहेत. या कार्यक्रमास सोलापूरकरांनी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले आहे.